दै. गोदातीर दि.25.01.25

# अवैधरित्या वाळू नेणाऱ्या चार हायवा पकडल्या



लोहा (प्रतिनिधी)– तालुक्यातील गोदावरी नदीकाठावर असलेल्या बेटसांगवी, शेवडी, कपिलेश्वर पेनुर, अंतेश्वर, चित्रावाडी, भारसवाडा तसेच येळी, चिंचोली, नांदगाव कामळज या गावच्या धक्क्यांवरून अवैधरित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या चार हायवा कंधार उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार यांच्या पथकाने पकडल्या.

लोहा तालुक्यात गोदावरी नदीकाठावरील गावात बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या वाहनांवर उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी यापूर्वीही धडक कारवाई केलेली आहे.

गुरुवारी रात्री साडे अकरा –बाराच्या सुमारास सोनखेड –दगडगाव रस्त्यावर एसडीएम श्रीमती संगेवार व त्यांच्या पथकाने वाळू घेऊन जाणाऱ्या चार हायवा पकडल्या. त्यानंतर सोनखेड पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षकांना यांची माहिती देण्यात आली. पोलिसांनी या चारही हायवा ठाण्यात आणून लावल्या.

याकार्यवाहीत तलाठी संतोष आस्कूलकर, नितीन रायाजी, कैलास बोधगिरे, संतोष कुमार जाधव सहभाग घेतला. उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार व त्याची टीम यांनी रात्रभर वाळू वाहने पकडण्यासाठी गस्त घातली. येळी चिंचोली भागात ते गेले. ही कार्यवाही होताच वाळू तस्कर भूमिगत झाले. पहाटे पाच वाजेपर्यंत एसडीएम व टीम यांची गस्त सुरू होती. चोरून वाळू विकणाऱ्या वाहनांवर व चालकांवर कायद्यांचा बडगा उगरण्यात आला आहे.